सत्यमेव जयते
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission
मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९०० फॅक्स : २२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३१९५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्र.१४७७(२)/२०१९/१४-अ दिनांक: २८ सप्टेबर, २०२१

# घोषणा

## राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०१९- (जाहिरात क्रमांक ७/२०१९)
## सुधारित अंतिम निकाल

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक १३ ते १५ जुलै, २०१९ या कालावधीत **राज्य सेवा (मुख्य) परीक्षा - २०१९** घेण्यात आली होती. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या आरक्षाणाच्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्रमांक ३१२३/२०२० प्रकरणी दिनांक ५ मे, २०२१ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२०२०/प्र.क.३२०/१६ब, दिनांक ५ जुलै, २०२१ अन्वये भरतीप्रक्रिया राबविण्यासंदर्भात शासनाकडून सविस्तर मार्गदर्शक सूचनानुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरीता आरक्षीत असलेली पदे अराखीव (खुल्या) पदांमध्ये रुपांतरीत करण्यात आली आहेत. प्रस्तुत परीक्षेच्या एकूण ४२० पदांचा सुधारित अंतिम निकाल संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासन स्तरावर मूळ प्रमाणपत्रांवरुन तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून दिनांक २८ सप्टेंबर, २०१९ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

**२.** उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक प्रवर्गाकरीता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (cut off marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत. त्यानुसार सदर परीक्षेमध्ये **श्री. चौगुले प्रसाद बसवेश्वर,** बैठक क्रमांक **PN००८३५६** हे राज्यातून सर्वसाधारण वर्गवारीमधून पहिले आले आहेत. **श्री. कुवर रोहन रघुनाथ,** बैठक क्रमांक **PN००३२३४** मागास वर्गवारीमधून प्रथम आले आहेत. तसेच महिला वर्गवारीतून **श्रीमती पाटील मानसी सुरेश** बैठक क्रमांक **PN००११३३** ह्या राज्यात प्रथम आल्या आहेत.

**३.** दिव्यांग वर्गवारीतील उमेदवारांची प्रमाणपत्रे वैद्यकीय मंडळाकडून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून शिफारस शासनाकडे करण्यात येत आहे. तसेच शासन निर्णय क्र.सा.प्र.वि.अपंग १००३/प्र.क्र.१२७/२००३/१६-अ, दिनांक ६ मे, २००४ मधील बाब क्र. (६) नुसार त्यांच्या नेमणुकीपूर्वी उमेदवार संबंधित पदावर नियुक्तीसाठी सक्षम आहे किंवा नाही याची देखील वैद्यकीय मंडळाकडून तपासणी केल्यानंतर ते नेमणुकीसाठी पात्र ठरतील.

**४.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या, अनाथ आरक्षणाच्या व अन्य मुद्दयांसंदर्भात विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्याय निर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

**५.** प्रस्तुत अंतिम निकालात शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे. अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईल मध्ये पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्रमांक ६.४.४ पहावी.)

मुंबई<br>
दिनांक : २८ सप्टेंबर, २०२१

उप सचिव (परीक्षा १)<br>
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई